# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना

(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)

दुरध्वनी क्रमांक [02482]-223132 टोल फ्री क्रमांक 1077 फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326

E-mail. rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com Website: - www.jalna.gov.in, http://59.90.142.57/ddmajalna


दिनांक २२/०३/२०२०

जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि-

(ई-मेलने/टपालाने)

**आपत्ती प्राधान्य**

**वाचा:-**

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
२) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक १३/०३/२०२०.
३) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक १४/०३/२०२०.
४) या कार्यालयाचे आदेश जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक २०/०३/२०२०.

**सुधारीत आदेश**

ज्याअर्थी, उपरोक्त वाचा क्र.२ चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम, २०२० प्रसिध्द केले असून यातील नियम क्र. ३ नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी, जालना जिल्हयामध्ये विविध ठिकाणी असलेल्या सर्व दुय्यम निबंधक कार्यालय (सब रजिस्ट्रार) मधील बायोमेट्रीक यंत्रणेद्वारे होणारे व्यवहार आणि आपले सरकार सेवा केंद्रामध्ये, सी.एस.सी.केंद्रामध्ये, महाऑनलाईन केंद्रामध्ये विविध प्रकारच्या शासकीय कामांसाठी होणारी नागरिकांची गर्दीमुळे व या केंद्रामध्ये विविध प्रकारच्या शासकीय कामांसाठी नागरिकांच्या हातांच्या बोटांचे बायोमेट्रीक यंत्रणेवर ठसे घेतले जातात या बाबीमुळे करोना विषाणूचा (COVID-19) प्रादुर्भाव होण्याचा धोका लक्षात घेता जालना जिल्हयातील सर्व आपले सरकार सेवा केंद्र, सी.एस.सी.केंद्र, महाऑनलाईन केंद्र दिनांक ३१, मार्च २०२० पर्यंत बंद करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मी **रविंद्र बिनवडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना** उपरोक्त वाचा क्र. २ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार करोना विषाणूचा (COVID-19) होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून रोगाचा फैलाव रोखण्यासाठी व अनावश्यक गर्दी टाळण्यासाठी संदर्भ क्र. ४ चे आदेशात अंशत: बदल करुन **जालना जिल्हयातील**

१) **सर्व दुय्यम निबंधक कार्यालय (सब रजिस्ट्रार) मधील खरेदीविक्री व इतर व्यवहारांसाठी नागरिकांच्या हातांच्या बोटांचे बायोमेट्रीक यंत्रणेवर ठसे घेतले जातात या बाबीमुळे करोना विषाणूचा (COVID-19) प्रादुर्भाव होण्याचा धोका लक्षात घेता सर्व दुय्यम निबंधक कार्यालय (सब रजिस्ट्रार) मधील बायोमेट्रीक यंत्रणेद्वारे होणारे व्यवहार,**
२) **जिल्हयातील सर्व बँकांचे दुष्काळी अनुदान, पिक विमा कर्ज वाटप व शासनाकडुन येणार इतर सर्व अनुदानाचे वाटप,**
३) **सर्व आपले सरकार सेवा केंद्र, सी.एस.सी.केंद्र, महाऑनलाईन केंद्र,**

**वरील १ ते ३ बाबी दिनांक ३१, मार्च २०२० पर्यंत बंद ठेवणेबाबत आदेशीत करीत आहे.** परंतू जालना जिल्हयातील ज्या नागरीकांना विविध प्रकारचे दाखले अत्याश्यक आहेत. सदर दाखल्याकरिता आवश्यक ती लागणारी कागदपत्रे त्यांनी स्कॅन करुन संबंधीत तहसील कार्यालयाच्या ईमेल वर मुदतीत पाठविण्यात यावीत. त्यामुळे सर्व नागरीकांना ऑनलाईन पध्दतीने दाखले वितरीत करण्यात येतील, संबंधीत यंत्रणेणे तशी दक्षता घ्यावी.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना उपरोक्त वाचा क्र.२ मधील महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० चे नियम ११ नुसार, भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) कलम १८८ मधील तरतुदीनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

Ravindra Laxman Binwade
Digitally signed by Ravindra Laxman Binwade
Date: 2020.03.22 19:36:06 +05'30'

**(रविंद्र बिनवडे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना**

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीस्तव:**

१) ई-डिस्ट्रीक प्रोजेक्ट मॅनेजर, जि.अ.का. जालना
२) महाऑनलाईन कॉरडीनेटर, जि.अ.का. जालना
३) उपविभागीय अधिकारी/तहसीलदार सर्व जिल्हा जालना यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी आपल्या कार्यालयाच्या ईमेलवर प्राप्त होणा-या अर्जावर तात्काळ ऑनलाईन पध्दतीने कार्यवाही करुन दाखले वितरीत करावेत.
४) उपनिबंधक/दुय्यम उपनिबंधक सर्व जिल्हा जालना
५) संबंधीतास अनुपालनास्तव.

प्रत:

१) मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) जिल्हा माहिती अधिकारी, माहिती कार्यालय जालना यांना प्रसिध्दीस्तव.